## 7. अनैतिक कथा व त्यातील मूल्ये

माणसाला आदर्शाचे घडे घालून देणा-या, मानवी मनाला नैतिक मूल्यांचे संदेश देणा-या पुराणकथा आहेत. हे आपण पाहिलेच परंतु कित्येक पुराणकथा नैतिक कल्पनेला झुगारुन देणा-या आहेत. या अशा कथांतून नरहत्या, फसवणूक, व्यभिचार, आप्तसंभोग इ. अनेक अनैतिक विषय आढळतात. अशापैकी काही कथांची व त्यातून आढळणारी नीती व अनीती यांची चिकित्सा येथे करणार आहे.

**एकलव्य कथा :**

हिरण्यधनु नामक व्याधाचा एकलव्य हा पुत्र. धनुर्विद्येच्या प्राप्तीसाठी निषाद राजकुमार एकलव्य हस्तिनापुर येथे द्रोणाचार्यांकडे आला. परंतु अंत्यज पुत्र म्हणून द्रोणाने याला आपला शिष्य करुन घेण्याचे नाकारले. आपल्या या अपमानाकडे दुर्लक्ष करुन द्रोणांना वंदन करुन एकलव्य परत फिरला. (म. आदिपर्व 123.10.12) [1]

तदनंतर विद्यासंपादनाचा दृढनिश्चय न सोडता याने द्रोणाची एक छोटी मृत्तिकामय प्रतिकृती तयार केली आणि या प्रतिमेसच आपला गुरु मानून तिच्या साक्षीने याने धनुर्विद्येच्या अध्ययनास प्रारंभ केला व अल्पावधीतच तो धनुर्विद्येमध्ये प्रवीण झाला.

एकदा द्रोणाचार्य आपल्या शिष्यांसह मृगयेसाठी वनात गेले. शिकार करीत असता त्यांचा कुत्रा दूर गेला व एकलव्याला पाहून भुंकू लागला. या कुत्र्याचे भुंकणे बंद व्हावे, परंतु कुत्र्यास कोणतीही इजा होऊ नये अशा खुबीने एकलव्याने सात बाण त्याच्या मुखाभोवती मारुन त्याचे भुंकणे बंद केले.

एवढा मोठा कुशल धनुर्धारी कोण? अशा जिज्ञासेने द्रोणांनी एकलव्याची गाठ घेतली. एकलव्याने गुरु म्हणून त्यांना आदराने वंदन केले. परंतु धनुर्विद्येची अशीच जोपासना होत राहिल्यास हा

अर्जुनापेक्षाही श्रेष्ठ धनुर्धर होईल अशी भीती द्रोणांस वाटली. तसे होऊ नये म्हणून त्याने कपटाने गुरुदक्षिणा म्हणून त्याचेजवळ त्याच्या उजव्या हाताचा अंगटा मागितला. त्यानेही तो भोळया भावनेने दिला. या गुरुभक्तीमुळे तो धनुर्धर या नात्याने निकामी झाला. (म.आदिपर्व 183.17)[2]

या कथेकडे बघताच 'आचार्य देवो भव' या कल्पनेला धक्का बसतो. प्रथमतः द्रोणांनी त्याला अंत्यजपुत्र म्हणून शिष्य म्हणून नाकारले खरे तर त्याकाळात वर्ण हा गुणावरुन ठरत असे स्पष्ट दिसते. उच्च कुळात जन्म घेऊन गुणकर्माने हीन कुलात गेलेले व हीन कुलात जन्म घेऊन उच्च कुलात दाखल झालेल्या माणसांची उदाहरणे आपणास आढळतात. केवळ जन्म हेच वर्णप्राप्तीचे गमक नव्हते असे असताना द्रोणांनी एकलव्याचे तो अंत्यज असल्याने शिष्यत्व नाकारले .

एवढे करुनही शिष्याने मात्र आपला गुरु तोच मानला व गुरुसमोर विद्याग्रहण करावी म्हणून गुरुची मृण्मयी प्रतिमा तयार केली. एकनिष्ठेने भक्तिपूर्वक त्या प्रतिमेस साक्षी ठेवून विद्याध्ययन केले व विद्येमध्ये प्रावीण्य संपादन केले.

योगायोगाने हे प्रावीण्य त्याच्या गुरुने पाहीले. जेव्हा गुरु द्रोणाचार्यांना हे समजले तेव्हा वस्तुतः त्यांनी एकलव्याची पाठ थोपटावयास हवी होती. केवळ आपल्या प्रतिमेला साक्षी ठेवून धनुर्विद्या पूर्णतः आत्मसात करणा-या या शिष्याचा अत्यंत अभिमान वाटावयास हवा होता. परंतु त्यांनी गुरुदक्षिणा मागितली व तीही एकलव्याच्या उजव्या हाताचा अंगठा. स्वतः त्याला शिष्य म्हणून स्वीकारलेच नसताना गुरुंनी गुरुदक्षिणा मागणे हे सर्वथा अनीतिमान वाटते. एकलव्याने आपणहून गुरुदक्षिणा दिली असती तर ते उचित ठरले असते. कारण जरी द्रोणांनी त्याचा शिष्य म्हणून स्वीकार केलेला नसला तरी एकलव्याने त्यांना गुरु मानले होते. गुरुदक्षिणा मागतानाही केवढे क्षुद्रत्व प्रकट केले आहे द्रोणांनी। ज्याने आपल्या प्रतिमेस साक्षी मानून धनुर्विद्या संपादन केली त्याच्या उजव्या हाताचा अंगठा. उजव्या हाताचाच अंगठा का तर तो धनुर्धर या नात्याने निकामी व्हावा म्हणून. एकलव्याने धनुर्धारी का बनू नये तर तो अर्जुनापेक्षाही श्रेष्ठ धनुर्धर ठरेल म्हणून. वास्तविक कुत्र्यास इजा न करता त्याच्या मुखाभोवती सात बाण मारुन कुत्र्याचे भुंकणे जेव्हा एकलव्याने बंद केले तेव्हाच तो अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धर ठरला व हे द्रोणांनाही जाणवले असावे म्हणूनच त्यांनी एकलव्याकडे अत्यंत अमानुष अशी दक्षिणा मागितली. वास्तविक अर्जुन द्रोणांचा शिष्य तसाच एकलव्यही. दोन शिष्यांना दिलेल्या

वर्तणुकीत फरक का? अर्जुनाने श्रेष्ठ व्हावे हे योग्य पण तो श्रेष्ठ ठरण्यासाठी एकलव्याने आपला उजवा अंगठा का द्यावा? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही? आपल्याच शिष्यांबाबत एवढा पक्षपातीपणा का? एकाच्या उन्नतीसाठी दुस-यावर अन्याय का? याचा विचार करता गुरु द्रोणांसारखा मनुष्य निःपक्ष, न्यायी नव्हता असे नाइलाजाने मान्य करावे लागते.

काहींच्या मते एकलव्य हा श्रेष्ठ धनुर्धर ठरला असता तर तो पुढे असुरी प्रवृत्तीने वागला असता म्हणून द्रोणांनी हे भविष्य जाणून त्याला वेळीच निकामी केले. हे समर्थन निखालसपणे अयोग्य आहे. द्रोणांना कसलेही भविष्य ज्ञात नव्हते व एकलव्य हा दुराचारी ठरेलच अशी ग्वाही ते कशावरुन देतात हेही कळत नाही.

एवढे मात्र खरे एकलव्याबाबत द्रोणांनी कपटनीती अवलंबिली, तीही अन्यायकारक, अमानुष रीतीने याउलट एकलव्य मात्र गुरुभक्तीमुळे अधिक श्रेष्ठ ठरला. त्याचीही एकनिष्ठ गुरुभक्ती ही त्याला वरदानाऐवजी शापच ठरली असे वाटते. म्हणून त्याच्या या असामान्य त्यागामुळेच तो आजही लोकांच्या स्मरणात आहे परंतु गुरु या संकल्पनेला द्रोणांचे वर्तन मात्र नक्कीच धक्का देणारे आहे.

**रेणुकेची कथा :**

प्रसेनजित राजाने कन्याकामेष्टी यज्ञ केला त्याचे फळ म्हणजेच रेणुका. तिने स्वयंवरात जमदग्नीला वरले. एकेदिवशी पाणी आणण्यासाठी सरोवराला गेली असता आपल्या राण्यांबरोबर जलक्रीडा करणारा गंधर्व पहात उभी राहिली. त्यामुळे परतायला उशीर झाला. परंतु हे सर्व जाणून जमदग्नीने आपल्या पुत्रांना तिचा वध करण्याची आज्ञा दिली. पुत्रांनी ती नाकारली. फक्त परशुराम हा पुत्र तयार झाला. त्याने वडिलांच्या आज्ञेवरुन आईचा व वडिलांची आज्ञाभंग करणा-या भावांचाही वध केला. पुढे प्रसन्न झालेल्या जमदग्नीने वर माग असे सांगताच परशुरामाने आईला पुनः जिवंत केले.[3]

येथे जमदग्नीने रेणुकेला केलेले शासन केवळ कठोरच नव्हे तर अन्यायकारकही आहे. रेणुका आपल्या राण्यांसमवेत जलक्रीडा करणारा गंधर्व पहात उभी राहिली त्यामुळे परतायला तिला उशीर झाला. एवढाच तिचा दोष. त्यासाठी शिक्षा मात्र देहदंडाची. गंधर्वाची क्रीडा बघितली यात कुठलाही गुन्हा नाही. कदाचित त्या बघण्यामध्ये काही काळ रेणुकेने मानसिक पातळीवर व्याभिचार केला असेल. अर्थात् तसेही आपण ठामपणे सांगू शकत नाही. कदाचित् जमदग्नींना तसे जाणवले असावे म्हणून त्यांनी तिला देहदंड

दिला. परंतु परपुरुषाला व तेही त्याच्या स्त्रियांबरोबर असताना पाहण्यात फार मोठा गुन्हा नक्कीच नाही. एकटया गंधर्वाला पाहून काही काळ ती मोहित झाली असती तर तिची चूक मान्य करता येईल. तीही तिने मानसिक पातळीवर व्यभिचार केला असे म्हणू शकू. परंतु येथे केवळ संशय आहे. रेणुकेने मानस व्यभिचार केला अशा संशयाने तिला जमदग्नीने एवढे कठोर शासन केले. तेही आपल्या मुलाद्वारे. जमदग्नीच्या इतर पुत्रांनी वडिलांची आज्ञा पाळली नाही हे एकादृष्टीने योग्यच आहे. कारण जर ती आज्ञा अयोग्य, अकारण असेल, अन्यायकारक असेल तर तिचे पालन न करणे यात अयोग्य काही नाही.

एकटया परशुरामाने मात्र वडिलांची आज्ञाभंग करणा-या भावांचाही वध केला. या त्याच्या कृतीने जमदग्नींनी प्रसन्न होऊन त्याला वर प्रदान केला. आपले पुत्र व पत्नी एका शुल्लक कारणासाठी मारले गेलेले पाहून एक मुनी प्रसन्न होतो हे बघून आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाही. मुनी हा क्षमाशील वृत्तीचा हवा. पण येथे त्याच्याउलट एक प्रकारची असुरी प्रवृत्तीचे दिसते. निदान परशुरामाने वडिलांनी दिलेल्या वराने आईला पुनः जिवंत केले. मातृऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु इतर बंधूंना केवळ वडिलांची आज्ञाभंग म्हणून प्राणांस मुकावे लागले हेही अयोग्य आहे.

येथे जमदग्नींची एकाधिकारशाहीच आहे असे म्हणावे लागते. त्यांच्या पातिव्रत्याच्या, पाल्याविषयीच्या कल्पना अतिरेकी वाटतात. समोरची व्यक्ती, तिचा गुन्हा, त्या गुन्हयाचे स्वरुप यांचा कुठलाही सारासार विचार त्यांच्याकडे नव्हता असे नाइलाजाने म्हणावे लागते. केल्या गोष्टीबद्दल कुठे पश्चातापही दिसत नाही. अत्यंत कठोर अंतःकरणाचे जमदग्नी आदरापेक्षा अनादरास प्राप्त होतात. त्याकाळची ही पुरुषप्रधान संस्कृती अन्यायी, विवेकशून्य होती असे या कथेपुरते तरी दिसते.

**च्यवनभार्गवाची कथा :**

शर्याती राजाची कन्या सुकन्या हिजबरोबर च्यवनभार्गवमुनींचा विवाह झाला. सुकन्या तरुण तर च्यवनभार्गव वृद्ध. एकदा त्याच्या आश्रमात अश्विनीकुमार आले . च्यवनऋषींनी त्यांची पूजा करुन अश्विनीकुमारांनी आपल्याला तारुण्य द्यावे अशी प्रार्थना केली. ही प्रार्थना करताना ' मला तारुण्य द्यावे म्हणजे मी यज्ञात सोमरसाचा भाग तुम्हांला देईन ' असे कबूल केले. ठरल्याप्रमाणे च्यवनभार्गवांना अश्विनीकुमारांनी तारुण्य दिले व च्यवनभार्गवांनी राजा शर्यातीकडून सोमयाग करविला व आपल्या तपोबलाने अश्विनीकुमारांना सोमपान करविले. इंद्राला ते सहन झाले नाही व त्याने यजन

करणा-या शर्यातीला मारण्यासाठी हाती वज्र घेतले. तेव्हा च्यवनभार्गवांनी इंद्राच्या हाताचे स्तंभन केले. इंद्राचा हात मोकळा करण्यासाठी सर्व देवांनी अश्विनीकुमारांना सोमाहुती देण्याचे मान्य केले व इंद्राचा हात मोकळा केला. (म.व.121.125)[4.]

या कथेचा विचार करता सामाजिक मूल्यांचे अधःपतन झाल्याचे जाणवते. प्रामुख्याने विवाहसंस्थेतील त्रुटी जाणवते. अर्थात आज आपण जी त्रुटी मानत असलो तरी त्या काळी ती त्रुटी, त्रुटी नव्हती हे मानणेही अयोग्य आहे. च्यवनभार्गवासारख्या वृध्द नवरदेवाला राजा शर्याती आपली कोवळी नाजूक कन्या वधू म्हणून अर्पण करतो. येथे वधू आणि वर यांच्यातील वयांची तफावत लक्षात घेतलेली दिसत नाही. अर्थात् बहुतेक धर्मग्रंथानीच पती-पत्नीच्या वयामध्ये फार तफावत ठेवलेली आहे. उदा. मनुस्मृती पती-पत्नीचे वय 24:8 या प्रमाणात असावे असे सांगितले आहे. तर महाभारतात ते प्रमाण 21:7 असे आहे. हे धर्मग्रंथांनी सांगितलेले वयाचे प्रमाण आज आपणाला नक्कीच अनैसर्गिक वाटते व ते आहेही. परंतु त्याकाळात ते तसे वाटत नसावे, जरी वाटणे योग्य होते तरी. म्हणूनच शर्यातीने आपली सुकुमार कन्या च्यवनभार्गवासारख्या वृध्द मुनीस दिली.

वयाची तफावत लक्षात न घेतल्याने कामपूर्तीस पूर्णतः निरागस व अजाण असलेली बालिका व कामपूर्तीस उत्कट तरूण यांचा विवाह हे जसे सर्वथा अयोग्य तसेच अतिवृध्दत्वामुळे कामपूर्तीस असमर्थ व कामपूर्तीस उत्कट तरुण कन्या यांचा विवाह म्हणजे एकप्रकारची विकृतीच होय.

म्हणूनच कदाचित् च्यवनभार्गवांनी अश्विनीकुमारांकडे तारुण्याची मागणी केलेली दिसते. या मागणीत च्यवनमुनींना जीवनाची तीव्र लालसा होती असे म्हणण्यापेक्षा आपल्या वयामुळे ते सुकन्येला योग्य ते कामसुख देत नसावेत, योग्य तो न्याय देत नसावेत हेच कारण अधिक सयुक्तिक वाटते. ते तारुण्य मिळविण्यासाठी च्यवन अश्विनीकुमारांना सोमाहुती देण्याचे कबूल करतात म्हणजेच त्यांना तारुण्यावस्था भोगण्याची अत्यंत तीव्र इच्छा होती म्हणण्यापेक्षा निकड होती हेच खरे कारण त्यासाठी त्यांनी इंद्राशीही युध्द पुकारले. त्याच्याशीही शत्रुत्व पत्करले. एखादी गोष्ट प्राप्त होण्यासाठी दुस-याशी शत्रुत्व करायलाही जेव्हा माणूस तयार होतो. तेव्हा त्या वस्तूची निकड, गरज ही आत्यंतिक तीव्र असते. म्हणूनच च्यवनांनी अश्विनीकुमारांना तारुण्य मागितले. त्याबदल्यात सोमरस देण्याचे आश्वासन दिले. एकप्रकारे लाच दिली. आपले काम करवून

BARR. [illegible] LIBRARY
[illegible] KOLHAPUR

घेण्यासाठी लाच देण्याची वृत्ती त्याकाळातही होती. कदाचित् नावात बदल असेल.

तसेच सुकन्येसारख्या राजकन्येचा विवाह च्यवनासारख्या वृध्दाशी होतो तेव्हा सुकन्येला स्वतःचे मत मांडाण्याचा अधिकार नसावा. पुनः एकदा पुरुषप्रधान संस्कृतीचे व त्यांनी स्त्रीवर केलेल्या अत्याचाराचे दर्शन येथे घडते. जरठ कुमारी असा हा विवाह तोही एकप्रकारे सक्तीने लादलेला असेच या कथेचे स्वरुप दिसते. म्हणूनच काहीशी आजच्यासारखीच अधःपतित सामाजिक मूल्ये त्याकाळी अस्तित्वात होती असे या कथेपुरते म्हणावे लागते.

**ययातिकथा** :

राजा ययातीने दैत्यगुरु शुक्राचार्य यांची कन्या देवयानी हिचेबरोबर विवाह केला. देवयानीने असुर राजा वृषवर्मा याची कन्या शर्मिष्ठा हिला आपली दासी म्हणून बरोबर नेले. पुढे राजा ययातीपासून शर्मिष्ठेलाही पुत्रप्राप्ती झाली हे जेव्हा देवयानीला कळले तेव्हा ती संतापून शुक्राचार्यांकडे गेली. शुक्राचार्यांनी ययातीला अकाली वार्धक्य दिले. नंतर ते वार्धक्य 'तुझ्या पुत्राला देऊन तू त्याचे तारुण्य घे' असेही सांगितले. ययातीच्या पहिल्या चारी पुत्रांनी त्याला तारुण्य देण्यास नकार दिला. परंतु त्याचा सर्वात धाकटा पुत्र पुरु याने वार्धक्य घेतले व आपले तारुण्य वडिलांना दिले. ययाती अनेक वर्षे विषयासक्त होऊन राहिला नंतर विषयासक्ती सोडून पुरुला त्याचे यौवन परत दिले व त्याला राज्याभिषेक करवून तो वनात गेला.

या कथेत ययातीची कामपिपासा किती पराकोटीची होती हे दिसते. या कामतृष्णेपुढे त्याला विवेकही उरला नाही. केवळ विषयोपभोगाच्या लालसेने आपला तरुण कोवळा पुत्र पुरुला त्याने आपले वृध्दत्व बहाल केले. आपण काय करीत आहोत याचाही विवेक ययातीला राहिला नव्हता. ज्याने अजून यौवनात पदार्पण केले तोच त्याला वृध्दत्व स्वीकारावे लागले. ज्याने तारुण्याचा कसलाच उन्माद उपभोगला नाही, त्याला वृध्दत्व प्राप्त झाले व ज्याने अनेक वर्षे विषयोपभोग भोगले तरीही पुनः विषयोपभोग घेण्यासाठी आपले वृध्दत्व दुस-याला देण्यासाठी ययाती तयार आहे. हे वृध्दत्व देण्यासाठी आपल्या पुत्राची निवड केली. आपण सोसलेले काबाडकष्ट पुत्राला भोगायला लागू नयेत म्हणून आजही मातापिता स्वतः अनंत कष्ट सोसून मुलांना सुखसोयी उपलब्ध करुन देताना दिसतात. परंतु ययाती आपल्या तरुण मुलाला राज्यकारभाराचे धडे देण्याऐवजी आपले वृध्दत्व देतो. ते देताना त्याच्यामागे काही कारणही फार उदात्त नाही. ते तसे असते तर निदान ययातीचे हे

वर्तन क्षम्य ठरले असते. येणारी नवी पिढी अधिक चांगली व्हावी, सुखी व्हावी म्हणून स्वतः त्रास घेणारे मातापिता कोठे? आणि स्वतःच्या कामसुखासाठी आपल्याच मुलाचे जीवन बरबाद करणारा ययाती कोठे?

याउलट पुरु आपले यौवन हसत हसत ययातीला देतो त्याचे वृध्दत्व स्वीकारतो. पुत्र कर्तव्य अत्यंत तत्परतेने पार पाडतो. पितृ-ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करतो. सर्व परिणामांना तोंड देण्यास सज्ज होतो या त्याच्या त्यागामुळेच अंती त्याला ययातीकरवी राज्याभिषेक होतो.

कित्येक हजार वर्षे ययातीने सुखोपभोग घेतला. फार मोठे धक्का देणारे व्यक्तीमत्व म्हणजे ययाती होय. कोणत्याच त-हेचे अगदी मनाचे बंधन नसलेला कामपिपासू ययाती या कथेत रंगविलेला आहे. खरे तर ययाती हा एक सम्राट म्हणूनच त्याचे हे चित्रण अत्यंत अवास्तव अतिरंजित वाटते. पुत्राला आपले वृध्दत्व देऊन पुत्राचे तारुण्य बिनदिक्कत उपभोगणारा ययाती सद्सद्विवेक बुध्दी सुध्दा गमावलेला दिसतो. कदाचित् कामसुखाचा, विषयभोगाचा अतिरेक माणसाची विवेकशक्ती संपुष्टात आणतो. विषयोपभोग भोगून तृप्त होत नसतो. तर तो अधिकच प्रबल होतो हे सांगण्यासाठीच जणू ययातीची ही कथा असावी. कामपुरुषार्थाचे प्राबल्य असेल तर दुःखाच ते उगमस्थान असते हे सांगण्यासाठीच ही कथा आहे. काम हा पुरुषार्थ आवश्यक आहे. परंतु त्याचे सेवन योग्य प्रमाणातच केले पाहिजे अन्यथा ते सर्वस्वाची होळी करणारे विष आहे हेच ही कथा जगाला सांगते.

**समुद्रमंथन** :

रामायण, महाभारत आणि पुराणे इ. ग्रंथांत भिन्न भिन्न प्रकारे सांगितलेली ही कथा.

एकदा देवेंद्र आपल्या हत्तीवर बसून चालला असता त्याला दुर्वास ऋषीने पाहिले आणि प्रसन्न होऊन आपल्या गळयातील दिव्य सुमनांची माला त्याला दिली. त्याने ती माला हत्तीच्या मस्तकावर ठेवली पण ती खाली पडली व हत्तीच्या पायदळी तुडविली गेली. त्यामुळे दुर्वास ऋषी संतप्त झाले आणि त्याने इंद्राला शाप दिला की,"तुझे वैभव व राज्य नष्ट होईल." त्या शापामुळे इंद्राची व सर्व देवांची शक्ती नष्ट झाली. पुढे देवासुरांचा संग्राम झाला. त्यात देवांचा पराजय होऊ लागला. देवांच्या अंगी पुरेसे बळच न राहिल्यामुळे ते मृत्यूमुखी पडू लागले. दानव मात्र मेले तरी शुक्राचार्यांच्या संजीवनी विद्येमुळे पुनः जिवंत होत. ते पाहून देवांना चिंता वाटू लागली. तेव्हा ते भगवान विष्णूला शरण गेले. श्रीविष्णूने त्यांना उपदेश केला की," तुम्ही

दानवांशी तह करा आणि त्यांच्या सहाय्याने समुद्रमंथन करून अमृत मिळवा. मी त्या कामी तुम्हांला साहाय्य करीन. अमृत तुम्हांलाच मिळेल. दानवांना मिळणार नाही, अशी व्यवस्थाही मी करेन."

मग देवेंद्र दानवांचा राजा बळी यांच्याकडे गेला व त्याने अमृत प्राप्त करुन घेण्याची कल्पना त्याला सांगितली. बळीने ती योजना मान्य केली. मग त्यांनी मंदर पर्वत उचलून समुद्रात उभा केला आणि तो घुसळण्यासाठी वासुकी नागाला दोरी होण्याची विनंती केली. वासुकीने ती विनंती मान्य केली. वासुकीची दोरी मंदर पर्वताभोवती गुंडाळून देवांनी वासुकीची शेपटी धरली आणि दानवांनी तोंड धरले. मग मंथन सुरु झाले. परंतु पर्वताला खाली आधार नसल्यामुळे तो समुद्रात बुडू लागला. तेव्हा भगवान विष्णूने कासवाचे रूप घऊन पर्वताला खाली आधार दिला. समुद्रमंथन सुरू झाले. समुद्रमंथनातून नानाविध रत्ने निघाली. उदा. उच्चैःश्रवा, कौस्तुभमणी, पारिजात, अप्सरा, लक्ष्मी, सुरा. शेवटी अमृतकुंभ हाती घेतलेला धन्वंतरी बाहेर आला. दैत्यांनी तो कुंभ हिसकावून घेतला. पण त्यांच्यात अमृतवाटपाबद्दल भांडण सुरू झाले. प्रत्येकजण 'मला आधी, मला आधी' असे म्हणू लागला.

शेवटी विष्णूने मोहिनीरूप घेतले आणि अमृतवाटपाचे काम स्वीकारले देव व दैत्य यांच्या दोन स्वतंत्र पंक्ती केल्या व आपल्या हास्य कटाक्षांनी तिने दैत्यांना झुलवीत ठेवले व सर्व अमृत देवांना वाटले.

दैत्यांनी युध्दास प्रारंभ केला. सर्व सामर्थ्यानिशी देवांना संत्रस्त केले. पण विष्णूच्या सहाय्याने अंती देवच विजयी झाले.

देव व दैत्यांच्या या संग्रामाची ही कथा फसवेगिरीने पूर्णतः भरलेली, संमुद्रमंथनासाठी दानवांचे सहाय्य घेतले. परंतु अमृत देण्याची वेळ आली असता मात्र देवांनी दानवांचा वाटा दानवांना दिला नाही. एवढेच नव्हे तर त्यासाठी लबाडीचा मार्ग ते स्वीकारतात. दैत्यांना स्वतः भगवान् विष्णू मोहिनी रूपाने फसवितात. आपल्या स्त्री रूपाची मोहिनी दैत्यांना घालून त्यांनी अमृतवाटप फक्त देवांमध्येच केले. आपले काम होईतोपर्यंत दैत्यांशी सामोपचाराचे वर्तन केले. अमृत मिळेपर्यंत संमुद्रमंथनासाठी दैत्यांची सर्वत-हेची मदत घेतली. परंतु अमृत मिळताच मात्र ते त्यांना मिळू द्यायचे नाही. यासाठीच प्रयत्न केले. किंबहुना सुरूवातीपासूनच दैत्यांची मदत मात्र घ्यावयाची व त्यांना अमृतप्राप्ती लाभू द्यावयाची नाही हे नक्की करूनच अमृतमंथन केलेले आहे. म्हणजेच लबाड फसवा हेतू मनात धरूनच त्यांनी हे कार्य आरंभिले. गरज सरो नि वैद्य मरो.

अशा त-हेचे धोरण देवांनी अवलंबिल्याचे दिसते

येथे दैत्य स्वभावतःच क्रूर आणि म्हणून अशा असुरांना अमृत पाजणे म्हणजे सर्पास दूध पाजण्यासारखे अन्यायाचे आहे म्हणून देवांनी असुरांना अमृत मिळू दिले नाही असाही युक्तिवाद करतील. तो योग्य आहे असेही आपण काही काळ म्हणू. परंतु देव म्हणजे सर्व सद्‌गुणांनी मण्डित तपस्वी, संयमी, शांत, न्यायी अशी सर्वसामान्य प्रतिमा. देव सर्वांचे रक्षणकर्ते, अत्यंत पराक्रमी व शक्तिशाली अशा या देवांच्या प्रतिमेला या कथेत धक्का बसतो. हे देव एकदम सर्वसामान्यांच्या पातळीला येऊन बसतात. किंबहुना फसवेगिरी, लबाडी, धूर्तपणा इ. अनैतिक मार्गही ते स्वीकारतात. आपले काम होईपर्यंत असुरांशी तडजोड करतात. नंतर मात्र त्याचा नाश करतात. म्हणजेच अत्यंत निंद्य वर्तन ते करतात. एवढेच नव्हे तर देववेषात राहून अमृत प्राशन केलेल्या राहूचे मस्तकही ते उडवितात.

आपल्या अतींद्रिय सामर्थ्यावर जर देवांनी अमृत मिळवले असते तर ते योग्य ठरते. परंतु त्यासाठी ते फसवेगिरी, लबाडी, खोटेपणा इ. अनैतिक मार्गांचा अवलंब करतात. म्हणून ही गोष्ट मनाला पटत नाही. ही कथा एकप्रकारे उपकारकर्त्यावरही अपकार करावे, गैर मार्गाचा अवलंब करूनही आपले इप्सित साध्य करून घ्यावे अशा अनैतिक विचारांना, मूल्यांना पुरस्कृत करते.

**महाभारतात उद्योगपर्वात आलेली माधवीची कथा :**

ही नहुषकुलोत्पन्न ययाती राजाची अल्पवयी कन्या. एकदा गरूडाने गुरूदक्षिणेसाठी मदत मिळावी या आशेने गालव या विश्वामित्रशिष्याला ययातीराजाकडे आणले. परंतु तेव्हा ययातीची परिस्थिती समाधानकारक नव्हती आणि म्हणून ययातीने आपली कन्या माधवी त्याच्या हवाली करून "हिच्याबद्दल दुसरे राजे तुला पैसे देतील, इतकेच नव्हे तर राज्यसुध्दा देतील" असे सांगितले. (म.उ.116)[7].

या सुंदर व सुलक्षणी कन्येला घेऊन गालवऋषी हर्यश्व राजाकडे गेला. हर्यश्व राजा माधवीला पाहताच मोहित झाला परंतु गालवाला हवे असलेले एका कानाने काळे व चंद्रासारखी प्रभा असलेले 800 अश्व त्याच्याजवळ नव्हते. तर त्याच्याजवळ फक्त दोनशेच अश्व होते. तेवढेच अश्व गालवाला देऊन व काही कालाने पुत्रप्राप्ती झाल्यानंतर माधवीला परत करण्याचा करार करून हर्यश्वाने माधवीला ठेवून घेतले. हर्यश्वाला माधवीपासून वसुमनस् नावाचा पुत्र होताच व कराराची मुदत संपताच त्रिकालज्ञ गालव हर्यश्वाकडे आला. हर्यश्वानेही माधवीस गालवाचे स्वाधीन केले. पुढे गालवाने माधवीला दिवोदास राजाकडे दिले. दिवोदास राजानेही

गालवाला दोनशे अश्व दिले व हर्यश्वाप्रमाणेच करार करून माधवीला पुत्रोत्पत्तीसाठी ठेवून घेतले. तिच्यापासून दिवोदासाला प्रतर्दन नावाचा पुत्र झाला. कराराची मुदत संपताच पुनः गालव दिवोदासकडे येऊन माधवीला घेऊन गेला.

नंतर त्याने भोजनगरीच्या उशीनर राजाला माधवीला दिले व वरीलप्रमाणेच करार करून गालवाला दोनशे अश्व दिले. उशीनराला हिच्यापासून शिबी नावाचा पुत्र झाला. करार संपल्यावर उशीनरापासून माधवीला घेऊन गालव चालला असताना त्याला गरूड भेटला. त्याने यापुढे तसले अश्व मिळणे शक्य नाही. तेव्हा मिळालेले सहाशे अश्व व बाकीच्या दोनशे अश्वांबद्दल माधवीलाच गुरूपुढे ठेवून गुरूदक्षिणेच्या ऋणातून मुक्त करण्यास विश्वामित्रांनाच विनंती करण्यास गालवाला सांगितले. तेव्हा त्यांच्या सांगण्यानुसार गालवाने विश्वामित्रांकडे येऊन मिळालेले सहाशे अश्व स्वीकारण्याची व उरलेल्या दोनशे अश्वांबद्दल माधवीला ठेवून घेऊन तिच्या ठायी पुत्रोप्तती करण्याची विनंती केली.

विश्वामित्राने ते कबूल करून अश्वांना आश्रमाभोवती सोडण्यास सांगितले व आपण माधवीच्या ठिकाणी रममाण झाला. पुढे विश्वामित्राला माधवीच्या ठायी अष्टक नावाचा पुत्र झाला नंतर विश्वामित्राने माधवीला गालवाच्या स्वाधीन केले.

गुरूदक्षिणा देऊन संतुष्ट झालेल्या गालवाने माधवीला तिचा पिता ययातीकडे पोहोचविले व तो तपश्चर्येसाठी वनात निघून गेला. (म.उ.115.120)[8.]

ही कथा अनेक प्रश्नचिह्ने उभी करते. माधवी ही राजकन्या तिचा अल्पवयी म्हणून उल्लेख आहे. ही अल्पवयीन मुलगी तीन राजांचे संसार करून शेवटी तपश्चर्येसाठी निघून जाते.

दोनशे अश्वांच्या मोबदल्यात हर्यश्व, दिवोदास व उशीनर यांच्याकडे राहून त्यांना पुत्रप्राप्ती करून देते. एकप्रकारे मुलीचा विक्रय केलेला दिसतो. व तोही गुरूदक्षिणा मिळविण्यासाठी अत्यंत अनैसर्गिक, मनाला न पटणारी ही कथा वाटते.

उरलेली गुरूदक्षिणा मिळत नाही हे नक्की समजताच गुरूलाच उरलेल्या दोनशे अश्वांबद्दल पुनः माधवीसारखी मुलगी शिष्याने अर्पण करावी व गुरूनेही ती सहज आनंदाने स्वीकारावी. खरोखरच अत्यंत हीन पातळीवरील हा सौदा वाटतो. गुरूला मुलगी अर्पण करणे व गुरूने ती स्वीकारणे एक अत्यंत अधम,

अप्रस्तुत असे कृत्य आहे. माधवीसारख्या मुलीचा चलन म्हणून उपयोग केलेला दिसतो. स्त्रीला अत्यंत हीन वर्तणुक दिल्याचे दिसते.

एका राजाने वापरलेली स्त्री दुस-या राजाने पुनः पत्नी म्हणून काही काळ स्वीकारायची व करार संपल्यानंतर ती पुनः तिस-याला अर्पण करायची, हे सर्वच चित्र इतक्या हीन पातळीवरचे वाटते की त्याचे वर्णन करण्यास शब्दच सापडत नाहीत. एकाची पत्नी दुस-या राजाने स्वीकारावी म्हणजेच पातिव्रत्याच्या कल्पना, नैतिक बंधने अत्यंत शिथिल होती असे म्हणावे लागते. असा आक्षेप येऊ नये म्हणूनच कदाचित् माधवीला मिळालेल्या वराचा उल्लेख केला असावा. तिला एका ब्रह्मनिष्ठाने वर दिला होता की, "ही कितीदाही प्रसूत झाली तरी प्रसूतीअंती हिची यौवनहानी न होता ही कुमारीच राहील" हा वर ही अत्यंत अनैसर्गिक वाटतो. ब्रह्मनिष्ठाच्या वरामध्ये एवढे सामर्थ्य असेलही परंतु वैद्यकिय शास्त्रानुसार हे कधीतरी शक्य होईल काय? आणि म्हणूनच ही कथा अप्रस्तुत, अवास्तव वाटते .

या वराच्या आधारे प्रत्यक्ष पिता आपल्या कन्येला गालवाच्या हाती सुपर्द करतो व "हिच्याबद्दल दुसरे राजे तुला पैसे देतील एवढेच नव्हे तर राज्यसुध्दा देतील," असे सांगतो. (म.उ.116) प्रत्यक्ष पित्याचे हे उद्गार अत्यंत घृणास्पद वाटतात. पैशासाठी विकणारा बाप हा परिस्थितीने अत्यंत अगतिक झालेला असतो. त्यामुळे तो सहानुभूतीस, अनुकंपेस पात्र होतो. परंतु येथे दुस-याचे काम होण्यासाठी, गुरूदक्षिणा पूर्ती करण्यासाठी स्वतःची कन्या दुस-याच्या स्वाधीन करून तिच्या आधारे तुम्ही स्वतःचे काम करवून घ्या असे सांगणारा पिता तिरस्कारास प्राप्त होतो.

कदाचित् ही मूळ कथा काही वेगळया संदर्भात असावी परंतु ती कालौघात विपर्यस्त रूपात पुढे आली असावी. त्यामुळे तिच्यातील गूढार्थ नीट उकलत नसावा. वस्तुस्थिती काही असो परंतु आज ज्या स्वरूपात आपल्यापुढे ही कथा आहे ते तिचे स्वरूप अनैसर्गिक, अप्रस्तुत, अवास्तव आहे हे नक्कीच.

अशाप्रकारे आजसुध्दा अनैतिक वाटणा-या, फसवणूक, असत्य, अहिंसा, अनैतिक स्त्री-पुरूष संबंध इ.अनेक नीतिमत्ता झुगारून देणारी मूल्ये, अनीतिमत्ता सांगणा-या अनेक कथा आल्या आहेत.

त्यांचे तत्कालीन संदर्भ कदाचित् वेगळेही असतील त्यामुळे तेव्हा त्यांचे अर्थ वेगळे असतील परंतु आज कालौघात तो संदर्भ, अर्थ नाहीसे झाले असावेत. कथा मात्र आहेत. आणि म्हणून कदाचित् आजच्या

संदर्भात त्या अनैतिक वाटत असाव्यात पण त्या तशा वाटतात, हे मात्र खरे आणि या अनैतिक गोष्टी ही माणसाला वाईटापासून होणारे दुष्परिणाम सांगून अनैतिक गोष्टींपासून दूर राहण्याचा सावधगिरीचा इशारा देतात. यातच त्यांचे खरे यश आहे.

* * *

## संदर्भ ग्रंथ


1) महापर्व आदिपर्व ।23,10.12

2) महापर्व आदिपर्व ।83 - 37

3) म.व. ।16 भा. 9.16

4) महाभारत वनपर्व ।21.125

5) भागवत पुराणं 2.18, ब्राह्मपुराण ।46

6) भागवत पुराण ।.3.8.8.12 म.आदिपर्व ।8.55

7) महाभारत उद्योगपर्व ।16

8) महाभारत उद्योगपर्व ।15.120